# मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ

## ई-निविदा सुचना क्र.:- का. अ. (पूर्व) / मुं.झो.सु.मंडळ/ निविदा/ ९१/२३-२४

कार्यकारी अभियंता [पुर्व] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ यांनी खाली दर्शविलेल्या कामाकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे/ सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी/एमईएस/मुंबई मनहानगरपालिका / सिडको/ बीपीटी/एमआयडीसी /एम.जे.पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून बी-१ (टक्केवारी नमुन्यात) ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई निविदा क्र | कामाचे नाव | निविदेचे अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम (अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ) (१%) | सुरक्षा अनामत रक्कम (अंदाजपत्रकीय रक्कमेच्या २%) | कन्त्राटदार नोंदणी वर्गवारी | निविदा रक्कम (१८% जीएसटीसहीत) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | एल. बी.एस. रोड, बिपिस्ट चर्च जवळ, तकिया वार्ड, कुर्ला (प) येथे सौंदर्यीकरण करणे. | ४९३६०४ | ४९३६ | १०,००० | Class-VIII & above | ५०० + ९०=५९० | ९ महीने पावसाळया-सहीत |
| २. | कुर्ला (पूर्व) म्हाडा कॉलनी जवळ, बेंचेस बसविणे. | ४९३६०४ | ४९३६ | १०,००० | Class-VIII & above | ५०० + ९०=५९० | ९ महीने पावसाळया-सहीत |
| ३. | वि.बी.नगर,कुर्ला (प) येथे भाग्योदय सोसायटी जवळ, सौंदर्यीकरण करणे. | ५७५८७२ | ५७५९ | १२,००० | Class-VII & above | ५०० + ९०=५९० | ९ महीने पावसाळया-सहीत |
| ४. | अष्टविनायक मार्ग नेहरु नगर, इमारत क्र. १४५ समोरील समाज कल्याण केंद्राची पुनर्बांधणी / दुरुस्ती करणे. | ८४३२४ | ८४३ | १७,०० | Class-VII & above | ५०० + ९०=५९० | ९ महीने पावसाळया-सहीत |
| ५. | कादर लाईम डेपो जवळ, मंडाळा, मानखुर्द मुंबई-४३ येथे वाचनालय बनविणे. | २५२९७२ | २५३० | ६,००० | Class-VII & above | ५०० + ९०=५९० | ९ महीने पावसाळया-सहीत |

**अ) कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ - दि. ०८.०१.२०२४ ते १५.०१.२०२४ (सकाळी ११.०० ते दु. ३.०० पर्यंत)**

**ब) मोहरबंद निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ - दि. १८.०१.२०२४ (सकाळी ११ ते दु. १.०० पर्यंत) (कार्यालयीन कामकाजदिवशी)**

१. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाहीतर द्वितीय न्युमतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करुन त्यानी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्याची निविदा मंजुर केली जाईल.

२. निविदाकारांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम, बँक ऐपतदारी आणि इतर कागपत्रे सादर करणेबाबत सविस्तर निविदा सुचना पहावी.

३. कोऱ्या निविदा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे/ सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी/एमईएस/मुंबई मनहानगरपालिका / सिडको/ बीपीटी/एमआयडीसी /एम.जे.पी.यांच्याकडे योग्य त्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पूर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.

४. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरताना ते कुठल्याही सरकारी/निमसरकारी संस्थेमध्ये काळय यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.

५. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबत प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे.

६. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत/शेडयुल बॅकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी "मुख्य लेखाधिकारी/ मुं.झो.सु. मंडळ" यांच्या नावावर दयावी.

७. कोऱ्या निविदांसाठी मागणी निविदांची रक्कम धनाकर्षाने स्विकारली जाईल. अर्ज करतांना धनाकर्ष हा दि. १५.०१.२०२४ पर्यंतचा "मुख्य लेखाधिकारी/ मुं.झो.सु. मंडळ" यांचे नावे मुंबई शाखेवर देय असावा.

८. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता, पूर्व विभाग,मु.झो.सु. मंडळ, खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), मुंबई- ५१ यांचेकडुन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वर नमुद केले नुसार **(अ)** प्रमाणे कोऱ्या निविदांची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात **(ब)** प्रमाणे स्विकृती केली जाईल. तसेच स्विकृती केलेल्या मोहरबंद निविदा शक्य झाल्यास स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी कार्यकारी अभियंता, पूर्व विभाग, मुं.झो.सु. मंडळ, यांच्या कार्यालयात दु.२.३० वा. नंतर उघडल्या जातील.

९. संयुक्तबोलीदाराची बोली आणि अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

१०. उप-ठेकेदाराचा अनुभव आणि त्यांच्या कडील साधने/साधन संपती विचारात घेतली जाणार नाही.

११.एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व), मुं.झो.सु. मंडळ यांचेकडे राहील.

१२. जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

१३. सर्व कर जसे की जीएसटी, इनकम टॅक्स, लेबर सेस, रॉयल्टी इ. बाबत शासने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार भरणे बंधनकारक राहिल.

१४. निविदा कागदपत्रे व निविदा विषयक मार्गदर्शन सुचनांबाबत काही शंका असतील तर निम्न स्वाक्षरीकार यांचे कार्यालयास संपर्क साधावा.

**कार्यकारी अभियंता (पुर्व),**
**मुं.झो. सु.मंडळ, मुंबई**